जनप्रवास

# ‘सायबर शिक्षा’ उपक्रमांतर्गत नागेश्वर विद्यालयात सायबर जनजागृती सत्र



■ जनप्रवास प्रतिनिधी

भिगवण : रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश्वर विद्यालय व जुनियर कॉलेज विद्यालयात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि क्रिक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या उपक्रमांतर्गत सायबर जागृती सत्र घेण्यात आलं.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य जितेंद्र गावडे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य सुभाष लकडे पर्यवेक्षिका अशा खोमणे उपस्थित होते.

या सत्रात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत महत्त्वाची माहिती अतिशय सोप्या आणि संवादात्मक पद्धतीने दिली. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फेक लिंक्स आणि ओटीपी स्कॅम, पासवर्डचं रक्षण, आणि वैयक्तिक माहितीची गोपनीयता यावर उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

सत्रात शाळेच्या विद्यार्थ्यांनी खूप उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी विचारलेले प्रश्न, अनुभव शेअर करणं आणि दिलेल्या माहितीबद्दल दाखवलेली उत्सुकता विशेष उल्लेखनीय होती. विद्यालयाचे प्राचार्य जितेंद्र गावडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत उपक्रमाचं कौतुक केलं आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमांनी सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती नक्की होईल असं मत व्यक्त केलं. संपूर्ण सत्र सोप्या मराठीत आणि विद्यार्थ्यांना समजेल अशा शैलीत घेण्यात आलं, त्यामुळे उपस्थित सर्वांनी ते सहजपणे आत्मसात केलं. सायबर जागरूकता उपक्रमात सहभागी क्लबचे अध्यक्ष अभय साहु, सचिव संदिप माने ,गतिविधी संचालक ज्योती गुरव ,मिडिया संचालक सायली ढगे. सायबर वॉरियर्स वृषाली जानभरे, माधवी कांबळे, बाळकृष्ण शिंदे आणि यश झिंजाडे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे नियोजन डॉ काशिनाथ सोलनकर,एन डी दराडे यांनी केले.सर्व शिक्षक व सेवक वृंदांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.


Powered by | softisky.com